तरुण भारत ■ बुधवार, १९ ऑक्टोबर २०२२

# हळबे महाविद्यालयातर्फे कसई मंदिर परिसरात स्वच्छता



कसई : ग्रामदेवतेच्या मंदिराची स्वच्छता करताना एनएसएसचे स्वयंसेवक.

वार्ताहर
दोडामार्ग

हळबे महाविद्यालयाच्या एनएसएस विभागामार्फत कसई ग्रामदेवतेच्या मंदिराची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छ भारत अभियानांतर्गत हळबे महाविद्यालयातील एनएसएस विभागाच्यावतीने ही स्वच्छता करण्यात आली. यावेळी प्रा. दिलीप बर्वे व डॉ. राजेंद्र इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या विभागाच्या स्वयंसेवकांनी मंदिरातील प्लास्टिक कचरा, परिसरातील प्लास्टिक आणि इतर कचरा जमा करून नगरपंचायतच्या कचराकुंडीमध्ये जमा केला. विहीर, सांस्कृतिक कार्यक्रमाचे स्टेज व सभामंडप झाडून स्वच्छ केले. या उपक्रमात सर्व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. प्राचार्य डॉ सुभाष सावंत यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.